ब्रह्मदेश (म्यानमार) मधील बुद्ध धम्म आणि आजचे वास्तव

विजय ज्ञानोबा साळवे
पाली आणि बुद्धिझम विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

प्रस्तावना :

पाली भाषा साहित्य आणि बुद्ध धम्म आविष्काराचे मूळ प्रेरणास्त्रोत तथागत गौतम बुद्ध होत. तथागतांच्या महापरिनिर्वाणानंतर 100 वर्षांनी वैशालीत द्वितीय धम्मसंगितीचे आयोजन करण्यात आले.[1] विनयपिटकाच्या चुल-वग्गात या धम्मसंगितीच्या वाद-विवादाची कारणे सांगण्यात आली आहेत, या व्यतिरिक्त वादाची इतर वेगळी कारणे वसुमित्र, भाव्य आणि विनितदेवांच्या तिबेटी भोट भाषेत व चिनी भाषेत भाषांतरीत केलेल्या ग्रंथांतून देण्यात आली आहेत.[2] सदर धम्मसंगितीत वाद-विवादामुळे भिक्खूसंघात पराकोटीचे मतभेद उत्पन्न झाले. याची परिणीती संघात फूट पडण्यात झाली. ज्यांनी वैशाली येथे संमत केलेल्या भिक्खूसंघाच्या ठरावाला विरोध केला, त्यांना भिक्खूसंघा-तून काढून टाकले. काढून टाकलेल्या भिक्खूंनी पुढे दहा हजार (10,000) भिक्खूंना एकत्र करून त्यांची परिषद भरवली, या परिषदेला महासांघिक म्हटले गेले, तर यशाने बोलाविलेल्या परिषदेला स्थविरांची परिषद म्हटले गेले. संघात महासांघिक आणि स्थविरवादी असे दोन पक्ष (सांप्रदाय) निर्माण झाले.[3] महासांघिक पक्षातील भिक्खूंना आगामी काळात चारशे (400) वर्षानंतर महायानी म्हटले गेले.[4] तथागतांच्या मूळ शिकवणुकीला मानणारे स्थविर-वादी (थेरवादी) तर सोईप्रमाणे बुद्ध शिकवणुकीत बदल करणारे महायानी म्हणून संबोधले गेले.

बुद्ध धम्म प्रथम प्रविष्ठतेसंबंधी विसंवाद :

ब्रह्मदेश हा देश थेरवादी म्हणून ओळखला जातो. ब्रह्मदेशात सर्वप्रथम बुद्ध धम्म कोणाद्वारे प्रविष्ठ झाला याविषयी विसंवाद प्रचलीत आहेत. बुद्धत्व प्राप्तीनंतर तथागतांना मधुपिंड आदि पदार्थ देणारे तपस्सु आणि भल्लीक नावाचे दोन बंजारा व्यापारी बर्मी होते आणि त्यांच्याद्वारे ब्रह्मदेशात सर्वप्रथम बौद्ध धम्माचा प्रवेश झाला.[5] असा ब्रम्ही लोकांचा विश्वास आहे. बौद्ध विश्वात तपस्सु आणि भल्लीक यांनाच बुद्ध आणि धम्माचे (शरणागत) प्रथम द्विवाचक उपासक म्हणून मान मिळालेला आहे.[6] कारण त्यावेळी संघाची निर्मिती झाली नव्हती, संघ निर्माण होणे प्रस्तावित होते. दस्तुरखुद्द ब्रम्ही लोकांची अशीही समजूत आहे की, बुद्धघोष नावाच्या पंडिताद्वारे ब्रम्हदेशात बौद्ध धम्म प्रवेशला.[7] या व्यतिरिक्त दिपवंश ग्रंथाच्या आठव्या आणि महावंश ग्रंथाच्या बाराव्या अध्यायांत अशोकाने विि-वध देश प्रांतात पाठवलेल्या धर्मप्रचारकांची नावे आलेली आहेत, ज्यामध्ये ब्रम्हदेशात (सुवर्णभूमि (पंगू आणि मूल्-ामेन)) सोन आणि उत्तर यांना धर्मप्रचारार्थ पाठवल्याचे आढळते.[8] यांनी ब्रह्मदेशाच्या दक्षिणेकडील तलैंग भागात बुद्ध-धम्म प्रविष्ठ केला.[9] अशी तेथील लोकांचीही ठाम समजूत आहे.

बौद्ध धम्माचे चलन-वलन :

ब्रम्हदेशात बौद्ध धम्म प्रवेशल्यानंतर काही गंभीर व शुल्लक संकटांचा अपवाद वगळता ''वादे-वादे जायते तत्त्वबोध'' या उक्तीन्वये ब्रम्ही बौद्धांनी अंतर्गत वाद- चर्चेतून बौद्ध धम्म उत्तरोत्तर उर्जितावस्थेत आणलेला आढळतो. राजा अनुरुद्धांच्या कार्यकाळात बर्मी वर्णमाला तयार करण्यात आली. तीमध्ये त्रिपिटक लेखबद्ध केले. तसेच बर्मी राजधानी पगानमध्ये धार्मिक शिक्षणासाठी संस्कृतला हटवून पाली भाषेला स्थान देण्यात आले.[10] तेथील पाली भाषेच्या प्रचार-प्रसाराची प्रचिती पगानमधील शिलालेखातून येते.[11] 1948 ला स्वतंत्र होताच ब्रम्हदेशाने बौद्ध धम्-माला आपला राजधर्म म्हणून घोषित केले. 1954 साली बर्मात 06 वी धम्मसंगिती झाली. या संगितीचा प्रमुख हेतू पालि त्रिपिटक तथा अट्ठकथा आदि साहित्य मुद्रीत करणे हा होता. याच परिप्रेक्ष्यात संपूर्ण त्रिपिटक भिक्षु जगदीश काश्यपांच्या नेतृत्वात भारतामध्ये पहिल्यांदा देवनागरीत संपादित केले गेले.[12]

ब्रम्हदेशात बुद्ध धम्माचा प्रचार-प्रसार कधीच जुलूम जबरदस्तीने किंवा फसवून केला गेला नाही. ही ब्रम्ही लोकांची पवित्रता म्हणावी लागेल. बौद्ध भिक्खूंच्या उपसंपदेसंबंधी तेथील सर्व भिक्खू-उपासक वर्ग फार जागृत आहे. तथागतांच्या दृष्टिकोनातील उपसंपदेचे (भिक्खू दिक्षा) सर्व सोपस्कार प्रामाणिकपणे पार पाडले गेले पाहिजेत, याविषयी ब्रम्ही लोक फार दक्ष आहेत. यामध्ये काही अनियमितता निदर्शनास आल्यास श्रीलंकन महाविहाराची पवित्र परंपरा लाभलेल्या भिक्खूकडून पुनश्च उपसंपदा घेणे अनिवार्य समजल्या जाते.[13]

सतराव्या शतकात बौद्ध धम्माच्या भवितव्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक दोन बाबींकडे ब्रम्ही लोकांनी लक्ष केंद्रीत केल्याचे दिसते.[14]

1) बौद्ध भिक्खूंनी अभिधम्माच्या अभ्यासावर लक्ष केंद्रीत करणे.

2) त्रिपिटक आणि धम्मविषयक इतर ग्रंथ ब्रम्ही किंवा इतर एतद्देशीय भाषेतून शिकवले जाणे.

अभिधम्मविषयक उत्तरोत्तर व्यासंगातून पुढे अभिधम्माचाच अविभाज्य भाग असलेली विपश्यना उदयास आली. ब्रम्हदेशातून गोयंका गुरूजींद्वारे ती प्रथमता भारतात आणली. तथापि भारतात समाधी, ध्यान आणि आ-भिधम्म, बौद्ध धम्म प्रवर्तनाच्या दृष्टीने घातक ठरतील.[15] असे निरिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विपश्यनेसंबंधी नोंदवले आहे.

18 व्या शतकात ब्रम्ही भिक्खूंनी बाहेर जातेवेळी दोन्ही खांदे झाकून (परिमंडळ) घेतले पाहिजेत असा वि-नय केलेला आहे.[16]

विनयांच्या नियमात थोडी शिथिलता आणावी, असे काही ब्रम्ही भिक्खूंचे म्हणणे होते. या बाबतीत विचार-विमर्श करण्यासाठी मिंडोन-मिनने जेष्ठ महाथेरोंची एक संगिती बोलाविली. त्या धम्मसंगितीत पूर्वापार चालत आलेल्या विनयांचे पालन करणे बंधनकारक करण्यात आले. तसेच भिक्खू कितीही मोठा असला तरी त्याने तथाग-तांच्या मूर्तीसमोर अष्टशील ग्रहण केले पाहिजे.[17] असा विनयाधीन नियम करण्यात आला. एका युरोपीयनावर बौद्ध भिक्खूने पॅगोड्यात पादत्राणे घालून आल्याबद्दल हल्ला चढवल्यामुळे त्यास जन्मठेपेची शिक्षा झाल्याची नोंद आहे.[18] ब्रम्ही उपासक व भिक्खू बौद्ध विनयाचे मोल प्राणापलीकडे जपतात. तेथील भिक्खूंनी राजकारणात भाग घेणे, विनयाच्या विरुद्ध समजले जाते.[19] ब्रम्हदेशात मार्क्स आणि बुद्ध यांच्या तत्त्वज्ञानाचा समन्वय साधण्याचा प्रयत्न झाला. परंतु ब्रम्ही समाजवाद्यांनी जुन्या दोन सत्यांचा संदर्भ देऊन बुद्ध तत्त्वज्ञान अंतिम सत्य आहे.[20] असे प्रतिपादन केले. ब्रम्हदेशातील प्रत्येक गावात भिक्खूंची सेवा केली जाते. गावातील विहारांची देखभाल करण्याबरा-बरच गाव-शहरातील उपासक-उपासिका क्रमवारीने भिक्खूंना भोजनदान देतात. प्रसंगपरत्वे ब्रम्ही भिक्खू पिंडपातासाठी चारिका करतात.[21] 'पिंड या संज्ञेचा अर्थ 'गोळा' असा असून प्रस्तुत संदर्भात त्याचा अर्थ 'अन्नाचा गोळा' आणि पर्यायाने 'अन्न' असा होतो. 'पात' या संज्ञेचा अर्थ '(पात्रात) असा आहे.[22] भगवंतांच्या काळापासून चालत आलेली पूर्वापार परंपरा ब्रम्ही भिक्खूंनी व उपासकांनी समन्वयातून जतन करून ठेवली आहे. कुशीनगर महापरिनिर्वाण चैत्याच्या दुरूस्तीसाठी एका ब्रम्ही उपासकाने तत्कालीन कालखंडात 18,000 (अठरा हजार) रूपये दिल्याची नोंद आहे.[23] महत्त्वाच्या कार्यासाठी आर्थिक दान देणे, हा ब्रम्ही लोकांचा स्थायीभावच आहे.

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दिक्षागुरू भदंत ऊ. चंद्रमणी महास्थवीर हे मूळचे ब्रम्हदेशीय होते. यांना भारतीय भिक्खू महाविर स्वामी यांनी उपसंपादीत केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर 1954 ला ब्रम्हदेशाची राजधानी रंगून येथे आयोजित केलेल्या विश्व बौद्ध (संगि-ती) संमेलनाला उपस्थित होते. संमेलनाला संबोधित करताना बाबासाहेबांनी बौद्ध प्रतिकांचे उदाहरण देऊन भारतात बौद्ध धम्माच्या पुनरागमनाचा ठाम आशावाद व्यक्त करून विविध देशातील बौद्ध प्रतिनिधींना स्तंभित व अंतर्मूख केले होते. संमेलनाला उपस्थीत असलेल्या प्रगाढ विद्वान थेरो, महाथेरोंशी रात्री उशिरापर्यंत बाबासाहेबांनी बौद्ध धम्म विषयक चर्चा केल्याचा संदर्भ मिळतो.[24] तसेच भारतातील आपल्या अनुयायांसमोर 'ब्रम्हदेशाचे उदाहरण आ-पल्यापुढे ठेवून वागलात तर तुमचा अभ्युदय झाल्याशिवाय राहणार नाही'[25] असे कल्याणात्मक गंभीर मतही त्यांनी व्यक्त केल्याचे दिसते.

आजचे वास्तव :

ब्रम्हदेशाचे 'म्यानमार' असे अधिकृत नामकरण 1991 साली करण्यात आले.[26] म्यानमारमधील रोहिंग्या (घुसखोर अरब मुस्लिम व्यापारी) आणि बौद्ध यांचा झगडा पूर्वापार आहे, अहिंसा हे बौद्ध धम्माचे मूलभूत वैशिष्ट असताना भिक्खू विराथू यांनीच हिंसेसाठी पुढाकार घेतला. रोहिंग्याची सर्वांगिण मालमत्ता नष्ट केली. 2012 मध्ये रोहिंग्यांनी एक बौद्ध महिलेवर सामूहिक अत्याचार करून जाहिरपणे तिची निर्घृण हत्या केली होती. त्याची तीव्र प्रतिक्रिया म्हणून म्यानमारमध्ये भिक्खू विराथू यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड धार्मिक हिंसा उफाळली.[27] प्रसंगानुरूप निर्णय घेण्याची ब्रम्ही लोकांची क्षमता येथे अधोरेखित होते. या सर्व पार्श्वभूमीवर, तथागत गौतम बुद्ध अहिंसेचे समर्थक होते व हिंसेचे निंदक होते, परंतु पाप चांगल्या गोष्टींचा नाश करीत असताना ते टाळण्यासाठी हिंसा हा अखेरचा उपाय असू शकेल हे त्यांनी अमान्य केले नव्हते.[28] या परिप्रेक्ष्यातून पाहिले असता भिक्खू विराथू यांनी जाणीवपूर्वक घडवून आणलेली हिंसा समर्थनीय ठरते.

ब्रम्ही भिक्खू ऊ. वज्रबुद्धि (अपभ्रंश-वजिराबुद्धि) महास्थविर यांचा त्यागही महाराष्ट्रीयन बौद्ध जनतेने पाहिला आहे, कधी पायपीट तर कधी बैलगाडीने त्यांनी धम्मप्रचारार्थ श्रामणेर संघासह भ्रमंती केली. प्रस्तुत लेखकाच्या गावी (फुले पिंपळगाव ता. माजलगाव जि. बीड) भिक्खू ऊ. वज्रबुद्धिचा श्रामणेर संघ 1992 साली दोन दिवस मुक्कामाला होता.

प्रसंग परत्वे बौद्ध धम्माच्या भवितव्याबाबतीत ब्रम्ही लोक कमालीचे जागृत आहेत. बौद्ध धम्म संरक्षणार्थ कठोरात-कठोर निर्णय घेण्याची क्षमता त्यांनी अंगी बाळगली आहे. यामुळेच ब्रम्हदेशात बौद्ध धम्म संस्कृती आलबेल आहे. आजच्या वर्तमान जीवनातही तथागत गौतम बुद्धांची जी मूलभूत तत्त्वे त्रिकालाबाधित सत्य आहेत. ती ब्रम्ही लोकांनी सोडलेली नाहीत. ते ती प्राणापलीकडे जपतात.

संदर्भ ग्रंथसूचि :

1) बुद्धोत्तर धम्म इतिहास - दीनबंधू, तथागत प्रकाशन, भीमनगर, अकोला. प्रथम संस्करण : 20 ऑक्टोबर, 1988 पृ. 3
2) भारतातील बुद्ध धम्माचा इतिहास, मा. शं. मोरे, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती : 17 सप्टेंबर 2012, पृ. 75
3) उपरोक्त, पृ. 76
4) बुद्ध विश्व विजय, भिक्षू निर्गुणानंद महाथेरो, प्रकाशक : शाक्यमुनी श्रावक संघ, जालना, चतुर्थ आवृत्ती 2008, पृ. 447
5) भगवान बुद्ध का इतिहास एवं धम्मदर्शन, भदंत धर्मकीर्ति महास्थवीर, प्रकाशक - भिक्षू महापंथ, नागपूर, प्रथमावृत्ती : 14 एप्रिल 1986, पृ. 390
6) विनय पिटक, राहुल सांकृत्यायन, प्रकाशक : द कार्पोरेट बॉडी ऑफ द बुद्धा एज्युकेशन फौंडेशन ताईपेई, तायवान, पृ. 77
7) बौद्ध पर्व (बौद्ध धर्माचा साद्यंत इतिहास), वासुदेव गोविंद आपटे, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जून 2002, पृ. 172
8) अशोक चरित्र, वासुदेव गोविंद आपटे, समन्वय प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती : जानेवारी 2013, पृ. 48-49
9) जगातील बुद्धधम्माचा इतिहास, मा. शं. मोरे, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती : 28 नोव्हेंबर 2012, पृ. 90
10) पालि साहित्य का इतिहास, राहुल सांकृत्यायन, उत्तरप्रदेश हिन्दी संस्थान, लखनौ, तृतीय संस्करण, 1992, पृ. 274,275
11) उपरोक्त, पृ. 281
12) उपरोक्त, पृ. 283

13) जगातील बुद्ध धम्माचा इतिहास, कित्ता, पृ. 101
14) उपरोक्त, पृ. 103
15) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड -17, भाग-03, प्रकाशन, महाराष्ट्र शासन, पृ. 508
16) जगातील बुद्ध धम्मचा इतिहास, कित्ता, पृ. 103
17) उपरोक्त, पृ. 104
18) उपरोक्त, पृ. 106
19) उपरोक्त, पृ. 107
20) उपरोक्त, पृ. 108
21) उपरोक्त, पृ. 110
22) सर्वोत्तम भूमिपुत्र-गोतम बुद्ध, डॉ. आ. ह. साळुंखे, लोकायत प्रकाशन, गेंडामाळ, सातारा, द्वितीय आवृत्ती : 22 ऑगस्ट 2007, पृ. 499
23) बुद्ध और उनके अनुचर, डॉ. भदंत आनंद कौसल्यायन, बुद्धभूमि प्रकाशन, कामठी रोड नागपूर, प्रथ-मावृत्ती : 14 ऑक्टोबर 2003, पृ. 76
24) बाबासाहब, डॉ. भदंत आनंद कौसल्यायन, बुद्धभूमि प्रकाशन, कामठी रोड, नागपूर, द्वितीय संस्करण, 1996, पृ. 10
25) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड -18, भाग-03, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती : 15 ऑक्टोबर 2002, पृ. 416
26) बुद्ध विश्व विजय, कित्ता, पृ. 124
27) मध्यम मार्ग (त्रैमाषिक), संपा. डॉ. अशोक गायकवाड, आवृत्ती : ऑक्टोबर-डिसेंबर 2017, पृ.M- 6
28) भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, सिद्धार्थ प्रकाशन, मुंबई, दहावी आवृत्ती : 1995, पृ. 383